बाळासाहेब वाघ यांच्या पुण्यतिथीनिमित्त मोफत शिबिरात तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

# भाऊसाहेबनगर येथील के. के. वाघ संकुलात २६९५ ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी

प्रतिनिधी | कसबे सुकेणे

भाऊसाहेबनगर येथे बाळासाहेब वाघ यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात २६९५ ग्रामस्थांनी विविध आजारांची तपासणी करून घेतली. के. के. वाघ शिक्षण संस्था, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन तसेच स्माईल व स्पिर्नेच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ८) हे तेरावे भव्य आरोग्य शिबिर के. के. वाघ शैक्षणिक संकुल, भाऊसाहेबनगर येथे उत्साहात पार पडले.

सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत चाललेल्या शिबिरात नेत्र, हृदय, महिला कॅन्सर, अस्थिविकार, फुफ्फुस व छाती, कान-नाक-घसा, दंत, पोटविकार, मेंदू, मूत्रसंस्था व किडनी अशा विविध तपासण्या करण्यात आल्या.

एकूण ८०७ नागरिकांची नेत्र तपासणी झाली असून त्यापैकी २४१ रुग्णांना मोतीबिंदू आढळून आला. या शिबिरात विविध नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांनी सेवा दिली. भाऊसाहेबनगरसह कसबे सुकेणे, मौजे सुकेणे, कारसुळ, कुंदेवाडी, शिरसगाव, ओणे, पिंपळस, कोठुरे आदी गावांतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त शकुंतला बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक अजिंक्य बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य, समन्वयक, पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.